Impact Factor 8.379

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-XIII | ISSUE-I | Jan. | 2026

Address
- Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR - DR.PRAMOD P. TANDALE

| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Manisha S. Ashtekar | An Analytical Study of Work–Life Balance and Occupational Stress among Women Bank Employees in Latur City | 1 To 5 |
| 2 | Dr. Kailas S. Mote & Mrs. Yogeshvari Indrakshe | Teaching Attitude in Higher Education: An Empirical Study of College Teachers | 6 To 9 |
| 3 | Sapna Ram Swami | A Critical Study of Post-modern Feminism in the Novels of Angela Carter | 10 To 11 |
| 4 | Dr. Kailas S. Mote & Mrs. Yogeshvari Indrakshe | Paradigm Shift in Teaching–Learning Attitude under the National Education Policy 2020 | 12 To 14 |
| 5 | Kshirsagar Aniket Anil | Fungal Species as Bioindicators of Environmental Pollution: Applications, Methodology, and Ecological Significance | 15 To 18 |
| 6 | Dr. Deepak S. Kamble | Impact of Budgetary Provisions in India's Agricultural Sector on The Nation's Economic Growth | 19 To 23 |
| 7 | Pradip Garole | Educational Needs Analysis (ENA): A Systems Based Diagnostic Architecture Using the ENA Diagnostic Matrix and the Implications Interventions Framework | 24 To 29 |
| 8 | Mr. Ananda Bhimrao Vibhute | Comparative Study of selected Small Cap Mutual Funds and Mid Cap Mutual Funds | 30 To 31 |
| 9 | Dr. Ruita Ranade & Dr.Ajesh Tambule | A Critical Review of Laghanaadhyaya In Ayurvedic Samhitas: Conceptual And Clinical Perspectives | 32 To 36 |
| 10 | Hameed Khan K. & Dr. Manjula G.K. | The Role of Traditional Healers in The Treatment of Ischemic Stroke:A Sociological Study | 37 To 42 |
| 11 | Hameed Khan K. & Dr. Manjula G.K. | Qualifying Traditional Healers in Health Enquiry: A Sociological Study | 43 To 47 |
| 12 | Dr. Ruita Ranade & Dr. Ajesh Tambule | Structural And Conceptual Significance of Saptachatushka in Charaka Samhita: A Critical Review | 48 To 50 |
| 13 | Prof. (Dr.) Sunita Hansraj Ambawade | A Comparative Study of Asset Quality Performance: An Analysis of GNPA Ratio of State Bank of India and HDFC Bank | 51 To 54 |
| 14 | Megha Nagesh Katneshwarkar | Make in India and The Evolution of Financial Support For Entrepreneurship in India | 55 To 59 |
| 15 | Prof. (Dr.) Sunita Hansraj Ambawade | Assessing the Effect of RBI Prudential Norms on Profitability Indicators: A Comparative Analysis of State Bank of India and ICICI Bank | 60 To 65 |

| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 16 | Anuradha Abhimanyu More & Sangeeta Suresh Deshmukh | A Literary Collection of Various Aspects of Aupamya with Special Reference to Charaka Samhita | 66 To 77 |
| 17 | Dr. Rajesh P. Karanjkar | Comparative Study on Explosive Strength between Volleyball and Basketball Players | 78 To 79 |
| 18 | Kirtimala Shankar Parab & Dr. Bhaskar Vishnu Igawe | Effectiveness Of Intelligent Tutoring System in Flipped Classroom on Academic Achievement of The Learner | 80 To 83 |
| 19 | Harjot Kaur & Harneet Billing | Exploring Attitudes Toward Artificial Intelligence Among Teacher Trainees in Punjab | 84 To 88 |
| 20 | Dr. Chitta Ranjan Malik | AI-driven Research Collaboration between India and Japan in Higher Education | 89 To 98 |
| 21 | Manoj Kumar Patel | From Blackboard to Bot: Transforming Teaching and Learning in the 21st Century | 99 To 103 |
| 22 | Keneisanuo Tseikha & Dr. K. Dhanalakshmi | Inclusion through Mental Calculation: A Thematic Review of Vedic Mathematics for Visually Challenged Students | 104 To 107 |
| 23 | Mr. Khushali U.Prabhu | Ethical Use of Artificial Intelligence in Microteaching: A Study of Awareness, Perceptions, and Attitudes of Student Teachers and Teacher Educators | 108 To 115 |
| 24 | Anirban Sen | Reimagining Pedagogy in the Age of Artificial Intelligence: Transformations, Challenges, and Future Directions in Teaching and Learning | 116 To 119 |
| 25 | Hemlata Patel | Teacher Preparation and AI Literacy: Redefining Pedagogical Competence for 21st-Century Classrooms | 120 To 124 |
| 26 | Dr. Rajiv Pancham, Mrs. Renuka Pardeshi & Ms. Akanksha Terane & Ms. Harsha Bandhakar | Digital Leadership in Higher Education: Educators' Perspectives on AI-Enabled Teaching Practices | 125 To 134 |
| 27 | Dr. Lawand Pandit Mahadeo | Gandhin Philosophy And Decentralization | 135 To 137 |
| 28 | प्रा.डॉ.मा.ना.गायकवाड | नागार्जुन के उपन्यासों में आर्थिक विपन्नता | 138 To 141 |
| 29 | डॉ. संते लालचंद्र रामचंद्र | भारतातील महिला उद्योजकांसमोरील आव्हाने : एक सखोल अभ्यास | 142 To 146 |

| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 30 | प्रा. संतोष बोंगाळे<br>डॉ. सचिन रुपनर | कर्णाची दोन रूपे : 'राधेय' आणि 'कौंतेय' | 147 To 152 |
| 31 | श्रीमती. वर्षा भिमाशंकर येणुरे | स्त्रीवादी दृष्टीकोन आणि जागतिकीकरण | 153 To 154 |
| 32 | प्राचार्य डॉ. केशव इंगोले,<br>प्रतिभा देशपांडे | संमिश्र अध्ययनपद्धत - भविष्यातील सक्षम शिक्षणाची पायाभरणी | 155 To 158 |

VOL- XIII ISSUE- I JANUARY 2026 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# कर्णाची दोन रूपे : 'राधेय' आणि 'कौंतेय'

**प्रा. संतोष बोंगाळे[1] डॉ. सचिन रुपनर[2]**
1. सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, वेणूताई चव्हाण महाविद्यालय, कराड ता.कराड जि. सातारा
ईमेल: ssbvcck@gmail.com
2. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव.

**सारांश :**

*पुराणातील एखादी पुराणकया निवडून त्यावर आधारीत पौराणिक कादंबऱ्या व नाटके लिहिण्यात येऊ लागली. रामायण महाभारतातील पौराणिक वास्तवाला नवे परिमाण देऊन अथवा नवा संदर्भ देऊन पौराणिक वातावरण, भाषाशैली, प्रसंगवर्णन इत्यादींच्या मदतीने पौराणिक कादंबऱ्याची व नाटकांची निर्मिती करण्यात येऊ लागली. या पौराणिक साहित्यकृती लिहिण्यासाठी जसा पुराणकथांचा वापर करण्यात येऊ लागला तसाच पुराणकथेतील प्रतिकांचाही उपयोग केला जाऊ लागला. रामायण महाभारतातील अनेक पात्रांभोवती मराठीत पौराणिक कादंब-यांची व नाटकांची रचना करण्यात आली. इतर पात्रांच्या तुलनेने कर्ण व कृष्ण या व्यक्तिरेखांभोवती लिहिण्यात आलेल्या कादंब-याची व नाटकांची संख्या अधिक आहे. मराठी वाङ्मयामध्ये पौराणिक कादंबरीचा व नाटकांचा एक वेगळा प्रवाह निर्माण झालेला दिसतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात तर पौराणिक नाटकांद्वारे परकीय सरकारवर टिका करण्याचे, सामाजिक व राजकीय प्रश्न मांडण्याचे व लोकजागृतीचे कार्य केले जाई. लोकरंजनातून लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केला जाई.*

***कि वर्ड:*** *कौंतेय, राधेय, पौराणिक कादंबरी, मराठी साहित्य*

**प्रास्तविक :**

प्रस्तुत शोधनिबंधात कर्ण या व्यक्तिरेखेभोवती लिहिलेल्या दोन वेगवेगळ्या साहित्यकृतींचा विचार केला आहे. शिरवाडकरांनी 'कौंतेय' नाटकातून तर रणजित देसाईंनी 'राधेय' कादंबरीतून कर्णाचे स्वभावदर्शन घडविले आहे. दोन्ही लेखकांनी एकाच पात्राभोवती दोन वेगवेगळ्या कलाकृतींची निर्मिती केली असली तरी दोन्हीमध्ये काही साम्यांबरोबरच बरेचसे भेदही जाणवतात. साहित्यप्रकरच्या प्रकारानुसार आणि त्याच्या वैशिष्ट्यानुसार साहित्यकृतीच्या चित्रणात फरक पडत असतो. याच कारणांमुळे 'कौंतेय', 'राधेय' मधील कर्णाच्या चित्रणात फरक पडल्याचे जाणवते. मात्र दोन्हीतून भेटणाऱ्या कर्णाच्या स्वभावगुणात बरेचसे साम्य आढळते. ‘राधेय’ कादंबरीतला कर्ण हा अलौकिक वाटतो तर 'कौंतेय' मधील कर्ण हा लौकिक पातळीवरील वाटतो. कारण त्याला मानवी विकार होतात, तो आपल्या आईवर रागावतो, तिचा द्वेष करतो, तिला दुषणे देतो. त्याचे हे वर्तन सर्वसामान्य माणसाप्रमाणे वाटते, जे त्याला सामान्य पातळीवर आणते. अशा स्वरूपाचे विविध स्वरूपाचे कर्णाचे चित्रण दोन्ही कलाकृतींमधून येते.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अस्तित्वात असणारा पौराणिक कादंबरीचा प्रवाह स्वातंत्र्योत्तर कालखंडातही अस्तित्वात असल्याचे दिसून येते. पुराणातील एखादी पुराणकया निवडून त्यावर आधारीत पौराणिक कादंबरी लिहिण्यात येऊ लागली. रामायण महाभारतातील पौराणिक वास्तवाला नवे परिमाण देऊन अथवा नवा संदर्भ देऊन पौराणिक वातावरण, भाषाशैली, प्रसंगवर्णन इत्यादींच्या मदतीने पौराणिक कादंबरीची निर्मिती करण्यात येऊ लागली.

तसेच पौराणिक कादंबऱ्या लिहिण्यासाठी जसा पुराणकथांचा वापर करण्यात येऊ लागला तसाच पुराणकथेतील प्रतिकांचाही उपयोग केला जाऊ लागला. उदा. क्रौंचवध, प्रेमद्वरा इत्यादी "पौराणिक कथांना थोडी मुरड घालून, जुन्या आख्यानाच्या आधारे आजच्या सामाजिक व

राजकीय प्रश्नावर प्रकाश टाकणे शक्य आहे.” [१] म्हणजेच कथा, कादंबऱ्या व नाटके यामधूनही पूर्वी सामाजिक व राजकीय प्रश्न मांडले गेले. पुराणकथेचा वापर करुन पौराणिक कादंबरी लिहिण्याचा पहिला प्रयत्न 'सावित्री-सत्यवान' या कादंबरीतून केला गेला नंतर बेहरे यांनी 'सीतावनवास', 'आहिल्योद्धार', वा. म. जोशी यांनी 'आश्रमहरिणी', साने गुरुजी यानी 'अस्तित्व' अशा पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या. मात्र या वाङ्मयीन प्रवासास खरा नावलौकिक मिळाला तो १९५९ साली प्रकाशित झालेल्या वि.स.खांडेकर याच्या 'ययाति' या कादंबरीने. या कादंबरीला मिळालेले यश, लोकप्रियता पाहून अनेक लेखकांनी पौराणिक विषयावर लेखन करून पौराणिक कादंबरीच्या वाङ्मयप्रवाहात मोलाची भर घालून हा प्रवाह अधिक समृद्ध केला.

**कर्णाची दोन रूपे : 'राधेय' आणि 'कौंतेय'**

रामायण महाभारतातील अनेक पात्रांभोवती मराठी पौराणिक कादंब-यांची रचना करण्यात आली. मात्र इतर पात्राच्या तुलनेत कर्ण या व्यक्तिरेखेभोवती लिहिण्यात आलेल्या कादंब-याची संख्या अधिक आहे. महाभारतातील कृष्णाएवढीच कर्ण ही व्यक्तिरेखा उठावदार आहे. पराक्रमी, दानशूर, त्यागी, स्वाभिमानी असूनदेखील नियतीच्या काळात सापडल्याने कर्णाची शोकांतिका झाली. अशा कर्णाला आपल्या कादंबरी लेखनातून न्याय देण्याचा प्रयत्न काही लेखकांनी केला. कर्णाच्या नावलौकिकपूर्ण पण उपेक्षित अशा व्यक्तित्त्वाचा शोध घेण्याच्या प्रयत्नातून 'मृत्युंजय', 'कर्णायन', 'महापुरुष', 'राधेय' या कादंब-यांचा जन्म झाला. उपरोक्त कादंब-यापैकी रणजित देसाई यांच्या 'राधेय' या कादंबरीतील 'कर्ण' चा विचार इथे करावयाचा आहे.

रणजित देसाईना लहानपणापासूनच महाभारतातील कर्णाचे आकर्षण होते. त्यातूनच त्यांची 'राधेय' ही कादंबरी १९७३ मध्ये जन्मली. या कादंबरीतील एकूण ५७ प्रकरणामधून कर्णाचे विविधरंगी व्यक्तिमत्त्व चित्रित करण्यात आले आहे. ज्या कर्णाला दुष्ट, कपटी, खलनायक मानले जात होते, त्याच कर्णाला लेखकाने आपल्या कादंबरीचा नायक बनवून तो निरपराधी असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्णाच्या मनातील पोरकेपणाचे, सूतपुत्राचे शल्य, दुःख मांडण्याचा प्रयत्न इथे केल्याचे जाणवते.

'राधेय' ही कादंबरी वाचत असताना आणखी एक गोष्ट जाणवत राहते, ती म्हणजे कर्णाच्या वाट्याला आलेले पोरकेपण, एकाकीपण हे पोरकेपण त्याच्या "मी कोण? मला का टाकलं गेलं ? माझ्या मनातून हा विचार कधीच सुटत नाही. पोरकेपणाची व्यथा भारी तीव्र असते." [२] या वक्तव्यावरून अधिक गडद होते. अशा प्रकारे हा कर्ण सतत आपल्या अस्तित्वाचा, आपल्या मातेचा शोध घेताना दिसतो. तो एकसारखा पोरकेपणाच्या दुःखात होरपळत असल्याचे जाणवते. त्याला वारंवार मी कोण ? हा प्रश्न सतावतो. तो याच व्यथेत जीवन कंठतो.

रणजित देसाई यांनी 'राधेय' कादंबरीतील कर्ण हा त्यागी, कुटुंबवत्सल, पराक्रमी, दानशूर, तत्त्वनिष्ठ, सत्प्रवृत्ती, मातृ-पितृ भक्त, मित्रावर अपार प्रेम करणारा, पत्नी व पुत्राबद्दल मनात आपुलकी बाळगणारा अशा स्वरूपात रेखाटला आहे. या कादंबरीतून लेखकाने कर्णाच्या अनेक स्वभावगुणवैशिष्ट्यांचा परिचय करून दिला आहे. इथला कर्ण दातृत्त्वशील आहे. दान मागण्यासाठी आपल्याकडे येणाऱ्या कोणाही याचकाला रिकाम्या हाताने परत पाठवणे त्याच्या स्वभावात नाही. त्याच्याकडे स्वतः देवेश्वर इंद्र देव याचक म्हणून येतात व दान म्हणून कर्णाची कवचकुंडलं मागतात. तेव्हा कर्ण ती कवचकुंडलं इंद्राला आनंदानं दान करतो. कुंतीला 'तिचे पाचही पुत्र जिवंत राहतील' असे वचन देऊन ते वचन आपल्या जीवाचे मोल देऊन पाळतोही. इथे दानशूरपणा हा कर्णाचा स्थायीभाव आहे. तसेच तो कुटुंबवत्सलदेखील असल्याचे जाणवते. राधा-अधिरथ या माता-पित्यांबरोबर वृषाली व वृषसेन या पत्नी व पुत्रावरतीही त्याचे नितांत प्रेम आहे. तसेच कुंती आपली माता व पांडव हे बांधव असल्याचे समजताच त्याच्या मनात पांडवाबद्दलची सूड भावना कमी होऊन ती जागा प्रेम, आपुलकी, सहानुभूतीने घेतल्याचे दिसून येते. असा कुटुंबवत्सल कर्ण येथे नजरेस पडतो.

कर्ण दुर्योधनावर आपला सखा, मित्र, जिवलग म्हणून खुप प्रेम करतो. दुर्योधनाच्या मैत्रीसाठीच तो द्रौपदी स्वयंवराला जातो, भानुमती दुर्योधनाला स्वपराक्रमावर मिळवून देतो, शेवटी याच मित्रासाठी पांडवांच्या, आपल्या भावांच्या विरोधात उभा राहून मृत्युला सामोरा जातो. त्याच्या अंगी दुर्योधनाविषयी प्रेम, आपुलकी, त्याग, भक्ती, तत्त्वनिष्ठा इत्यादी गुण असल्याचे आढळून येते. त्यातून कर्णाचे मित्रप्रेम प्रतित होते. कर्णाला कपटनीती, घातपात

आवडत नाही. त्याचा पराक्रमावर आणि स्वतःच्या बाहुबळावर अतोनात विश्वास आहे. तो दुर्योधनाला म्हणतो - 'पराक्रमानं शत्रू जिंकावा, घाताने नव्हे.' तो सरळमार्गी व चिंतनशील असा आहे. वरील सर्व गुण अंगी असूनदेखील कर्ण नेहमीच उपेक्षित राहिला. नेहमीच दुर्लक्षिला गेला. त्याची सतत 'सूतपुत्र' म्हणून अवहेलना केली गेली. त्याच्याकडे व त्याच्या अंगी असणाऱ्या गुणांकडे तो केवळ सूतपुत्र आहे म्हणून जाणूनबुजून दुर्लक्ष केले गेले. त्याची गुरूग्रही, आखाड्यात उपेक्षा केली गेली. भीमाकडून, शल्याकडून त्याची घोर निर्भत्सना केली जाते. पक्ष्याच्या लक्ष्यभेद प्रसंगी, "राधेया, मागं हो ! सूतपुत्रांना एकाग्रता लाभत नाही. युवराजांचा लक्ष्यभेद नीट बघ. त्यांचं अनुकरण कर. त्यातच कल्याण आहे. "[३] असा स्वतः गुरू द्रोणाचार्य त्याचा अवमान करतात. कौरवांच्या राजदरबारातही त्याला सूतपुत्र म्हणून वारंवार हिणवले जाते.

'राधेय' मधील कर्णाच्या वाट्याला जन्मापासून ते अखेरपर्यंत दुर्दैवच आल्याचं दिसून येतं. त्याला क्षत्रिय असूनही, 'कौंतेय' असूनही सतत सूतपुत्राचं दुःख सहन करावं लागलं. कर्णाच्या जीवनाची शोकांतिका होते ती केवळ दुर्दैवामुळेच. शेवटी असे म्हणता येईल की, कर्णाची शोकांतिका ही अपरिहार्य अवस्थेतूनच निर्माण झाली आहे. अशा कर्णाचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवताना लेखकाने महाभारतातील काही मूळच्या प्रसंगात थोडेफार बदल केले आहेत. तर काही प्रसंगातून काल्पनिकता अवतरली आहे. उदा. कृष्ण व कर्णाची चंपानगरीतील पहिली भेट, वृषसेन आणि कृष्ण यांच्यातील जिव्हाळ्याचा प्रसंग, जरासंध पराक्रमाचे वर्णन, द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगी कर्णाचे वागणे व बोलणे अशा इतरही काही प्रसंगात काल्पनिकता जाणवते. तर कर्णाच्या मृत्युसमयी दुर्योधनाने येणे, कर्णाचा व त्याचा भावपूर्ण संवाद होणे, रणांगणावर पडलेला निळा शेला दुर्योधनानं कर्णाच्या सांगण्यावरून आणणे व त्याचीच वीरशैय्या देणे इत्यादी घटना भावपूर्ण रितीने मांडल्या आहेत.

'राधेय' मधील कर्णाचे चित्रण करत असताना लेखक रणजित देसाई प्राप्त परिस्थितीत एखाद्या व्यक्तिवर होणारे विविध प्रकारचे संस्कार, त्याच्यावर पडणारी सामाजिक बंधने, त्याच्या मनात असणाऱ्या धर्मश्रद्धा या सर्वांमधूनच त्या व्यक्तीचा मार्ग क्रमित होत असतो हे दाखवून देतात. त्याचबरोबर कर्णाच्या व्यक्तिरेखेतील अर्थपूर्णता सांगताना लेखक जीवनमृत्युचे चिंतन करतो. रणजित देसाईंनी 'राधेय' कादंबरीतून पराक्रमी, दानशूर, मित्रावर जीवापाड प्रेम करणारा, कुटुंबवत्सल, तत्त्वनिष्ठ, सरळमनाचा, चिंतनशील, पोरकेपणाचं, एकटेपणाचं ओझं, दुःख मनावर सतत बाळगत आपल्या मातेचा, अस्तित्वाचा शोध घेणारा दुर्दैवी कर्ण वाचकांसमोर उभा केला आहे. वास्तविक पाहता कर्ण सुस्वभावी, सरळमार्गी, सुष्ट असा आहे. पण केवळ तो पांडवांच्या विरोधात लढतो, दुर्योधनाच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहून साथ देतो, मित्रप्रेमापोटी दुर्योधनाच्या प्रत्येक गोष्टीत बरोबरीचा वाटा उचलतो, बदल्याच्या भावनेपोटी द्रौपदीचा अपमान करतो म्हणून त्याच्यावर कपटी, दुष्ट, अनीतीने वागणारा म्हणून ठपका पडला आहे.

ज्याप्रमाणे कादंबरी वाङ्मयामध्ये पौराणिक कादंबरीचा एक वेगळा प्रवाह निर्माण झालेला दिसतो. तसाच प्रवाह नाट्यवाङ्मयातही अस्तित्वात असल्याचे आढळून येते. मराठीतील नाट्यवाङ्मयाचा उदयच पौराणिक विषयावरील 'सीतास्वयंवर' या विष्णुदास भावे यांच्या नाटकाने झाला. म्हणजेच मराठी रंगभूमीवर पौराणिक मराठी नाट्यवाङ्मयाच्या उदयापासूनच अस्तित्वात होती. या नाटकांद्वारे परकीय सरकारवर टिका करण्याचे सामाजिक व राजकीय प्रश्न मांडण्याचे लोकजागृतीचे कार्य केले जाई. लोकरंजनातून लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केला गेला. "जनसामान्यांची पुराणकथाप्रीती हेरून अनेक नाटककारांनी पौराणिक नाटकांच्याद्वारे स्वकालीन सामाजिक प्रश्नांचा जो प्रपंच मांडला, तो याच लोकशिक्षणाच्या भूमिकेतून."[४] प्रारंभी किर्लोस्कर, खाडिलकर, वरेरकर, औंधकर, बेडेकर, गुर्जर अशा अनेक नाटककारांनी पौराणिक विषयावर नाटके लिहिली व आजही अशी पौराणिक नाटके रंगमंचावर सादर होताना दिसतात.

पौराणिक नाट्यवाङ्मयातही कादंबरीप्रमाणेच कर्ण या व्यक्तिरेखेभोवती बरीच नाटके लिहिण्यात आली. महाभारतातील कर्णाची शोकात्म व्यक्तिरेखा नाटककरांना सतत आव्हान देते. त्यातूनच 'महारथी कर्ण', 'पहिला पांडव', 'कौंतेय', 'राधेय-कर्ण' अशा नाटकांची निर्मिती झाली. या नाटकांपैकी वि. वा. शिरवाडकर यांच्या 'कौंतेय' या एकमेव नाटकास अधिक लोकाश्रय मिळाला. या नाटकातील कर्णाची व्यक्तिरेखा, त्याची शोकांतिका हृदयाचा ठाव घेते. शिरवाडकर हे एखाद्या व्यक्तित्व दर्शनाने झपाटून जातात आणि त्यावरती आपले लेखन करतात. त्यांना शोकनाट्याचे अनिवार्य असे आकर्षण असून त्यांची नाट्यप्रवृत्ती ही

शोकनाट्यास अनुकूल अशीच आहे. त्यांच्या नाट्यप्रतिभेस उदात्त व ध्येयवादी अशा व्यक्तित्वाचे नायकाच्या जीवनातील जीवन संघर्ष रेखाटण्यात अधिक रस वाटतो आणि त्यातून कर्णाच्या शोकांत अशा जीवनावरचे 'कौंतेय' हे नाटक त्यांनी लिहिले आहे.

हे नाटक १९५३ साली प्रकाशित झाले व त्याचा पहिला प्रयोग 'मुंबई मराठी साहित्य संघा' च्या नाट्यशाखेच्या विद्यमाने ६ जानेवारी १९५३ रोजी झाला या नाटकातील घटना प्रसंगातून कर्णाचे व्यक्तित्वदर्शन, त्याचे स्वभावगुण यावर प्रकाश टाकण्यात आला आहे या नाटकातील तीन अंक व दहा प्रवेशातून कर्णाच्या जीवनातील काही ठळक प्रसंगाचे चित्रण आले आहे दुर्योधनाने सर्वसंमतीने कर्णाला सेनापती करणे, कुंतीने येऊन त्याला जन्मरहस्य सांगणे, पांडवांची भेट होणे व त्याचा शेवट होणे अशाप्रकारचा कथाभाग आलेला आहे. या सर्व प्रसंगातूनच कर्णाचे स्वभावचित्र रेखाटण्यात आले आहे. हे नाटक कर्णाच्या व्यक्तित्वाचे प्रत्ययकारी असे दर्शन घडविते 'कौंतेय' नाटकाद्वारे नाटककाराने अनौरस संततीच्या वाट्याला येणाऱ्या दुर्भाग्याची विदारकता दाखविली आहे. येथे व्यक्तिदर्शनातून स्वभावदर्शन घडविले आहे. हे नाटक स्वभावप्रधान आहे.

'कौंतेय' मधून येणारे कर्णाचे चित्रण हे व्यामिश्र स्वरूपाचे आहे. मोजक्याच घटना-प्रसंगाच्या सहाय्याने नाटककार कर्णाच्या मनाचा वेध समर्थपणे घेतो. कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे विदारक असे दर्शन घडवितो. 'राधेय' मधील कर्णाप्रमाणेच शिरवाडकरांच्या कर्णाच्या मनात आपण मातृहीन असल्याची महाकाय व्यथा, वेदना, दुःख असल्याचे जाणवते. हा कर्णही त्या कर्णाप्रमाणेच स्वतःच्या स्वत्वाचा, मी कोण? या प्रश्नाचा व आपल्या मातेचा शोध घेताना दिसतो. 'राधेय' कादंबरीतील कर्ण जसा 'मातृद्रोह' की 'मित्रद्रोह' अशा दोलायमान स्थितीत दिसतो. तसाच 'कौंतेय' मधील कर्ण हा 'मातृप्रेम' की 'मित्रप्रेम' अथवा 'प्राप्तकर्तव्य' अशा मानसिक आंदोलनावर उभा आहे. तो मानसिक वेदनांनी व्यथित असल्याचे सतत जाणवत राहते. शिरवाडकरही कर्णाचे सेनापती, दानशूर, मित्रावर अपार प्रेम करणारा, वचनबद्ध असा कर्ण चित्रित करतात.

'कौंतेय' नाटकातील कथानकापेक्षा कर्णाचे स्वभावरेखाटन, स्वभावदर्शन अधिक प्रभावी वाटते. येथील कर्णाचे व्यक्तिमत्त्व विलोभनीय असे वाटते. त्याचबरोबर कर्णाच्या अंतःकरणातील मित्रप्रेम, वचननिष्ठा, कर्तव्यनिष्ठा, कुटुंबवत्सलता आदी स्वभावगुणांचे मनोज्ञ असे दर्शन घडविण्यात आले आहे. सदर नाटकातील कर्णाचा त्याग, पराक्रम, त्याची दानशूर वृत्ती, त्याचे मातृप्रेम, त्याच्या मनातील कोमल भावना, त्याचा स्वाभिमान या सर्व गुणांच्या दर्शनाने कर्णाचे भव्य दिव्य व संपन्न असे व्यक्तित्व नजरेसमोर उभे राहते.

'कौंतेय' नाटकातील संघर्ष परिस्थितीजन्य असून तो परिस्थिती व नियती अशा स्वरूपाचा आहे. इथला नायक हा परिस्थितीपेक्षा नियतीच्या भोवऱ्यात अधिक सापडलेला दिसतो. "नाटकात निर्माण झालेला संघर्ष दोन सुष्ट व्यक्तीतील नाही. दोन सुष्ट दुष्ट मनोवृत्तींचाही तो संघर्ष नाही. परिस्थितीप्राप्त अवस्थेत दोन आदर्श व्यक्तींच्या जीवनात नियतीने आधीच निर्माण केलेल्या बिकट समस्येमुळे भीषण द्वंद्व निर्माण केले आहे, आणि तेही अशाप्रकारे की, कोणाच्याच जयापजयात आनंदाची प्राप्ती नाही. कोणत्याही उपायाने पार्थिव सुखाची शक्यता नाही." [५] अशा स्वरूपाचा संघर्ष इथे प्रकटतो. अशाप्रकारे शिरवाडकरांचा कर्ण हा प्रतिकूल परिस्थितीतही नियतीशी व परिस्थितीशी झगडतो आणि म्हणूनच त्याची व्यक्तिरेखा उदात्त व प्रभावी अशी वाटते.

वरीलप्रमाणे शिरवाडकरांनी 'कौंतेय' नाटकातून तर रणजित देसाईंनी 'राधेय' कादंबरीतून कर्णाचे स्वभावदर्शन घडविले आहे. दोन्ही लेखकांनी एकाच पात्राभोवती दोन वेगवेगळ्या कलाकृतींची निर्मिती केली असली तरी दोन्हीमध्ये काही साम्यांबरोबरच बरेचसे भेदही जाणवतात. 'राधेय' मधील कर्णाचा जीवनपट मांडताना लेखकाने कर्णाच्या जन्मरहस्याबरोबरच इतरही बऱ्याचशा घटना सविस्तरपणे सांगितल्या आहेत. मात्र 'कौंतेय' नाटकात कर्णाच्या जीवनातील सेनापती होण्यापासून ते रणांगणावर येणाऱ्या मृत्युपर्यंतच्या घटनांचे चित्रण आले आहे. नाटकातील कर्णाचे चित्रण मोजक्याच घटना प्रसंगाची निवड करून संक्षिप्तपणे करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक घटना-प्रसंगावर येथे प्रकाश टाकता आलेला नाही.

'राधेय' कादंबरीत राजसूय यज्ञ समारंभ, द्रौपदी स्वयंवर, पांडवांचा तेरा वर्ष वनवास, धूतक्रीडेचा प्रसंग, कर्णाने केलेला दिग्विजय, कृष्ण शिष्टाई, कर्ण-कृष्ण भेट इत्यादी अनेक घटना-प्रसंग आले आहेत. त्यांच्या मदतीने कर्णाचे दर्शन घडविले आहे. मात्र 'कौंतेय' मधून या घटना-प्रसंगांना स्थान नाही. तर नाटकातील कर्णाने पांडवांच्या

शिबिरात जाऊन कुंतीला भेटणे, त्याचवेळी तेथे पांडवांचे आगमन होणे व त्यांनी त्याचा कटू शब्दात अपमान करणे हे प्रसंग नव्याने येतात. कादंबरीत आपण 'कौंतेय' असल्याचे कर्णाला सर्वप्रथम कृष्णाकडून समजते. नाटकात हे सत्य स्वतः कुंतीकडूनच समजते. या बदलांबरोबरच स्थलकालातही काही बदल केले आहेत. कादंबरीत कर्णाला कुंती गंगा किनारी मध्यान्ही भेटते, तर नाटकात ती त्याच्या शिबिरात रात्री जाऊन भेटते.

रणजित देसाईंचा 'राधेय' मधील कर्ण मातृत्त्वाबद्दल आदर बाळगून असलेला दिसतो. तर 'कौंतेय' मधला कर्ण मातृत्वाचा, मातेचा अवमान करतो. जेव्हा त्याला कुंती तो आपला पुत्र असल्याचे सांगते. तेव्हा कर्ण तिला म्हणतो, "आईचं अंतःकरण ! असली अधम, भेकड अंतःकरणं वरच्या गोजिरवाण्या स्तनांसकट हत्तीच्या पायाखाली ठेचली पाहिजेत. कुंती, तीन पांडवांना तू दूध पाजून वाढवलंस, दोघांच्या मस्तकावर आपल्या पैठणीच्या पदराची छाया धरलीस ! पण या पहिल्या कौतेयाला मात्र तू हलाहल पाजून त्याचं जीवन बरबाद केलंस.... स्वतःच्या सुखाचा मार्ग निर्वेध करण्यासाठी, चांडाळणी.... चालती हो इथून" ६ असा आपल्या मातेचा अपमान करतो. इथे कुंतीबद्दलचा कर्णाच्या मनातील द्वेष व्यक्त होतो. एवढेच नव्हे तर तो तिला माता मानण्यास, तिचे मातृत्व स्वीकारण्यास नकार देतो. त्याला हे सगळं नाटक, कूट कारस्थान आहे असं वाटतं.

परंतु 'राधेय' कादंबरीतील कर्ण कुंतीला लगेच आपली माता मानतो व तिचे मातृत्त्व लगेच मान्य करतो. तिला तिचे 'पाचही पांडव जिवंत राहतील' असे वचन देतो. तिला आदराने वंदन करतो. तिला उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून झाडाखाली घेऊन जातो. पांघरण्यास स्वतःचा शेला देतो. तो तिच्या मातृत्त्वाचा आदर करताना दिसतो. असा बदल केला आहे.

हा बदल होणे साहजिकच वाटते. कारण कादंबरीतील कर्णाला कृष्णाने कौरवांची शिष्टाई फसल्यानंतर त्याचे जन्मरहस्य सांगितलेले असते व नंतर कुंती सांगते. म्हणून त्याने कुंतीवर लगेच विश्वास ठेवणे योग्य वाटते. मात्र नाटकात हे रहस्य सर्वप्रथम कर्णाच्या शत्रूची पांडवांची माता कुंती सांगते, तेही युद्धाच्या आदल्या रात्री. तेव्हा त्याला ते नाटक वाटून त्याने त्यावर अविश्वास दाखवणे स्वाभाविकच आहे. म्हणून हा बदल योग्यच वाटतो. तसेच नाटकात जांधिल, माधवी, वासंतिका ही पात्रे नव्यानेच अवतरतात. तर शल्य या पात्राच्या भूमिकेत थोडासा बदल करण्यात आला आहे. कादंबरीतील शल्य हा दुष्ट, तर नाटकातील शल्य हा इमानदार आहे. नाटकात कुंती कर्ण हा 'पहिला पांडव' असल्याचे स्वतः पांडवांना सांगते. कादंबरीत हे सत्य कृष्ण सांगतो. अशा स्वरूपाचे अनेक बदल कादंबरी आणि नाटकात करण्यात आले आहेत. दोन्ही कलाकृतींचे लेखक व दोन्हींचे वाङ्मयप्रकार भिन्न-भिन्न असल्याने असे साम्य-भेद निर्माण होणे स्वाभाविकच आहे. वाङ्मयप्रकारानुसार कोणत्याही कलाकृतीचा घाट तयार होत असल्याने असे भेद निर्माण होतात. नाटकातील कर्ण काही अंशी कठोर वाटतो. कारण कादंबरीतील कर्ण आपल्या दारी येणाऱ्या प्रत्येक याचकास त्याचे इच्छित असे दान देऊन संतुष्ट करत असतो. परंतु तोच नाटकातील कर्ण दारी आलेल्या आपल्या मातेवर उन्मत्तपणे बोलून शाब्दिक प्रहार करतो, तिला शिव्या देऊन तिच्या ममतेचा अपमान करतो. या कारणास्तव कर्ण कठोर वाटतो.

अशाप्रकारचे साम्य-भेद 'कौंतेय' व 'राधेय' या कलाकृतींतून करण्यात आले आहेत. असे असले तरी दोन्ही साहित्यकृतींमधून पराक्रमी, दानशूर, मित्रावर, मातेवर प्रेम करणारा, त्यागी, कुटुंबवत्सल, स्वाभिमानी कर्ण भेटतो. मात्र कादंबरीत कर्णाच्या जीवनातील अनेक घटना- प्रसंगांचा समावेश केला असल्याने कर्णाच्या लहान-सहान स्वभाववैशिष्ट्यांवर, त्याच्या व्यक्तित्व दर्शनावर अत्यंत प्रभावीपणे प्रकाश टाकण्यात आला आहे. नाटकात आलेल्या कमी घटना-प्रसंगांमुळे कर्णाची काही स्वभाववैशिष्टये, स्वभावगुण अंधारात राहतात, त्यांची निटशी उकल होत नाही. या कारणास्तव कादंबरीतून जसे कर्णाचे व्यक्तिचित्र पूर्णपणे उभे राहते तसे नाटकातून उभे राहण्यास काही मर्यादा पडतात. नाटककारास स्थलकालाच्या अंकाच्या मर्यादा सांभाळूनच व नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर सादर होणार आहे हे ध्यानात घेऊनच त्या मयदित राहूनच नाट्यलेखन करावे लागते. शिवाय पात्रसंख्येचेही त्याला भान ठेवावे लागते. 'कौंतेय' नाटकातून कर्णाचे चित्रण करण्यासाठी नाटककाराने महाभारतातील काही मोजकेच घटना-प्रसंग व पात्रांची निवड केली आहे. नाटकाचा पट लहान असल्याने नाटकाचा कालावधीही अल्पसा आहे. परंतु कादंबरीचा आवाका मोठा असल्याने व वरील बंधने नसल्याने कादंबरीतील घटना-प्रसंग, कालावधी, पात्रसंख्या वाढविणे शक्य असते. रणजित देसाई यांनी महाभारतातील अनेक घटना-प्रसंग व पात्रांची निवड करून 'राधेय' मधून कर्णाचे बारकाव्याने

स्वभावरेखाटन केले आहे. त्याच्या व्यक्तित्वाचे अनेक पैलू उलगडून दाखवले आहेत.

नाटककारास नाटकातील प्रवेशांची संख्या व ते सादर करण्यासाठी असणारा कमी वेळ यामुळे व्यक्तीचा विशिष्ट कालखंड निवडून त्या नाटकाच्या चौकटीत त्या संपूर्ण कालखंडाचा समावेश करावा लागतो. तो पात्राच्या विशिष्ट कालखंडावरच प्रकाश टाकू शकतो. पण कादंबरीकारास हे बंधन नसल्याने तो विशिष्ट कालखंड अथवा व्यक्तीचा संपूर्ण जीवनपट निवडतो. 'राधेय' मधून कर्णाचा संपूर्ण जीवनपट उलगडून दाखविला आहे. अशा कारणांमुळे 'कौंतेय', 'राधेय' मधील कर्ण चित्रणात फरक पडल्याचे जाणवते. मात्र दोन्हीतून भेटणाऱ्या कर्णाच्या स्वभावगुणात बरेचसे साम्य, समानता आढळते. दोन्हीतूनही कर्णाची वेगवेगळी रूपे अनुभवण्यास मिळतात. 'राधेय' कादंबरीतला कर्ण हा अलौकिक वाटतो तर 'कौंतेय' मधील कर्ण हा लौकिक पातळीवरील वाटतो कारण त्याला मानवी विकार होतात, तो आपल्या आईवर रागावतो,तिचा द्वेष करतो, तिला दुषणे देते त्याचे हे वर्तन सर्वसामान्य मानसाप्रमाणे वाटते जे त्याला सामान्य पातळीवर आणते. अशा स्वरूपाचे कर्णाचे चित्रण दोन्ही कलाकृतींमधून येते.

**संदर्भ :**

१) बापट, प्र. वा, गोडबोले, ना. वा. 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती ३ री, १९७३, पृ.३७.
२) देसाई रणजित : 'राधेय', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १९७३, पृ.१८.
३) तत्रैव : पृ.२५.
४) लिमये, शकुंतला,' पौराणिक नाट्यसृष्टी', सुपर्ण प्रकाशन, पुणे,आवृत्ती पहिली, १९७८, पृ.३.
५) गोमकाळे, द.रा.: 'रंगभूमीच्या परिसरात', सिटी बुक स्टॉल, पुणे, आवृत्ती पहिली, १९६५, पृ.७५.
६) शिरवाडकर, वि.वा., : 'कौंतेय', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली, १९५३, पृ. ५३.